| | | |
|---|---|---|
| MHKO160005712017 | दाखल तारीख | - १०/१०/२०१७ |
| | नोंदणी तारीख | - १०/१०/२०१७ |
| | निकाल तारीख | - १६/०३/२०२६ |
| | कालावधी | - ०८ वर्षे ०५ महिने ०६ दिवस |

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १७५/२०१७** **निशानी क्र.**

**भाग अ**

( फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद क्र. ४४(i) अन्वये )

| | | |
|---|---|---|
| **शाहूवाडी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी**<br>**ता. शाहुवाडी, जि. कोल्हापुर यांचे न्यायालयात**<br><br>( पिठासिन अधिकारी - पी. बी. पवार यांचेसमोर )<br>न्यायनिर्णय घोषित – दिनांक १६/०३/२०२६<br>( संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १७५/२०१७ ) | | |
| गुन्हा नोंद क्र.- ५०/२०१७, शाहुवाडी पो. ठाणे, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापुर | | |
| फिर्यादी / तक्रारदार | :- | महाराष्ट्र शासन,<br>मार्फत पोलीस निरीक्षक, शाहूवाडी पो. ठाणे,<br>ता. शाहूवाडी, जि. कोल्हापुर |
| अभियोग पक्षातर्फे विधिज्ञ | :- | सहा. सरकारी अभियोक्ता कु. एस. व्ही. चिमटे |
| आरोपी | :- | नामदेव हरी खोत, व.व.४८, धंदा- शेती,<br>रा.- करंजोशी पैकी जुळेवाडी, ता. शाहुवाडी,<br>जि. कोल्हापुर |
| आरोपीतर्फे विधिज्ञ | :- | श्री. एस. ए. लाड |

# भाग ब

( फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद क्र. ४४(ii) अन्वये )

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :- | १२/०२/२०१७ |
| फिर्याद दाखल दिनांक | :- | १३/०४/२०१७ |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :- | २५/०९/२०२४ |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | :- | २७/०१/२०२५ |
| न्यायनिर्णसाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :- | १६/०३/२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | :- | १६/०३/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :- | निरंक, आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते |

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

## आरोपीची माहिती

| आरोपी क्र | आरोपीचे नाव | अटक दिनांक | सी. आर. पी. सी. कलम ४१(अ) (१) प्रमाणे नोटीस | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (Set Off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नामदेव हरी खोत | २०/०४/१७ | २०/०४/१७ | भा.दं.वि.सं.कलम २७९,३३७, ३३८ व मोटार वाहन कायदा कलम १८४,१३४ब/१८७ | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

## भाग क

( फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद क्र. ४४(iii) अन्वये )

### अ अभियोग पक्षातर्फे साक्षीदार

| सा. क्र. | साक्षीदाराचे नाव | स्वरूप | निशाणी |
|---|---|---|---|
| १ | संजय पांडुरंग महाजन | पंचनामा पंच साक्षीदार | १९ |

### क न्यायालयातर्फे निशाणी -(फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १ | १ | दोषारोपपत्र |
| २ | नि.१ सोबत | अटकेचे नमुने |
| ३ | नि.१ सोबत | निवेदन |

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

## न्यायनिर्णय

## (घोषित दि. १६/०३/२०२६)

१. आरोपीविरूध्द भारतीय दंड संहिता १८६० चे कलम २७९, ३३७, ३३८ व मोटार वाहन कायदा कलम १८४,१३४ब/१८७ अन्वये गुन्हा केल्याचा आरोप ठेवून संपरिक्षित करण्यात आले आहे.

२. अभियोगपक्षाची हकीकत थोडक्यात अशी की, -

घटना ही दिनांक १२/०७/२०१७ रोजी १३.०० वाजणेचे सुमारास येलूरपैकी पाचरवाडी, ता. शाहुवाडी गावचे हद्दीत, कोल्हापूर ते रत्नागिरी जाणारे रोडवर बंडू मोरे यांचे शेताजवळ रोडवर घडली आहे. घटनेचे वेळी व ठिकाणी आरोपीने त्याचे ताबेतील बजाज सीटी १०० मोटरसायकल क्र. एम.एच.०९डी.झेड.११२८ हे वाहन भरधाव वेगाने,

हयगयीने, निष्काळजीपणे, रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करून हयगयीने चालवून समोरील आंब्याकडून जाणारी स्प्लेंडर मोटरसायकल क्र. एम.एच०९डी.के.६०८६ हीस पाठीमागून धडक देऊन अपघात केला व मोटरसायकलस्वार सुरेश बंडू देसाई व मोटरसायकलवर पाठीमागे बसलेली सुरेखा राजाराम खोत यांना खाली पाडून जखमी केले. तसेच अपघातानंतर आरोपी हा सदरचे अपघाताची वर्दी न नेता तसाच निघून गेला. त्यानंतर श्री. फारूक इस्माईल पिरजादे, तत्कालीन पो.ना.ब.नं.१२३१, शाहुवाडी पो. ठाणे यांनी सदर अपघाताबाबत सरकारतर्फे शाहूवाडी पो. ठाणे येथे आरोपीविरुध्द फिर्याद दिलेली आहे.

३. फिर्यादी यांनी दाखल केलेल्या फिर्यादीवरून आरोपीविरूध्द शाहूवाडी पो. ठाणे येथे गु.र.नं.५०/२०१७ हा दाखल होवून त्याचा तपास देखिल फिर्यादीकडे यांचेकडेच वर्ग झाला होता. तपासअधिकारी यांनी तपासादरम्यान साक्षीदारांचे जाबजबाब घेतले, तसेच घटनास्थळाचा पंचनामा केला, वैदयकीय व अन्य कागदपत्रे प्राप्त करुन तपासाअंती आरोपीविरूध्द पुरेसा पुरावा उपलब्ध झाल्यानंतर त्यांचेविरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA सत्यमेव जयते

४. यापूर्वी मी आरोपीविरूध्द निशानी ११ येथे गुन्हयाचा तपसिल निश्चित केला आहे, आरोपीस तो तपशिल वाचून, समजावून सांगितला असता त्यांनी अपराधाची कबूली दिली नाही आणि संपरिक्षेची तयारी दर्शविली. तसेच आरोपीविरूध्द कोणताही गुन्हादर्शक पुरावा अभिलेखावर न आलेने त्याचा भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ३५१ प्रमाणे जबाब नोंदविण्यात आलेला नाही.

५. अभियोग पक्षाचा खटला, अभिलेखावरील पुरावा यावरून माझे विचारार्थ खालील मुद्दे आले आहेत व त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | आरोपीने दिनांक १२/०७/२०१७ रोजी १३.०० वाजणेचे सुमारास येलूरपैकी पाचरवाडी, ता. शाहुवाडी गावचे हद्दीत, कोल्हापूर ते रत्नागिरी जाणारे रोडवर बंडू मोरे यांचे शेताजवळ रोडवर, त्याचे | नकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| | ताबेतील बजाज सीटी १०० मोटरसायकल क्र. एम.एच.०९डी.झेड.११२८ हे वाहन भरधाव वेगाने, हयगयीने, निष्काळजीपणे, रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करून, जेणेकरुन मानवी जीवीत धोक्यात येईल अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापत अगर क्षती पोचण्याचा संभव असेल इतक्या बेदरकारपणे किंचा हयगयीने चालविले आणि त्याद्वारे भारतीय दंड संहिता कलम **२७९** खाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे हे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | |
| २ | आरोपीने वरील नमूद दिनांक वेळी व ठिकाणी त्याचे ताबेतील बजाज सीटी १०० मोटरसायकल क्र. एम.एच.०९डी.झेड.११२८ हे वाहन भरधाव वेगाने, हयगयीने, निष्काळजीपणे, रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करून हयगयीने चालवून समोरील आंब्याकडून जाणारी स्प्लेंडर मोटरसायकल क्र. एम.एच०९डी.के.६०८६ हीस पाठीमागून धडक देऊन मोटरसायकलस्वार सुरेश बंडू देसाई व मोटरसायकलवर पाठीमागे बसलेली सुरेखा राजाराम खोत यांना खाली पाडून जखमी करणेस कारणीभूत झाला आणि त्याद्वारे भारतीय दंड संहिता कलम **३३७** खाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे हे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | नकारार्थी. |
| ३ | आरोपीने वरील नमूद दिनांक वेळी व ठिकाणी त्याचे ताबेतील बजाज सीटी १०० मोटरसायकल क्र. एम.एच.०९डी.झेड.११२८ हे वाहन भरधाव वेगाने, हयगयीने, निष्काळजीपणे, रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करून हयगयीने चालवून समोरील आंब्याकडून जाणारी स्प्लेंडर मोटरसायकल क्र. एम.एच०९डी.के.६०८६ हीस पाठीमागून धडक देऊन मोटरसायकलस्वार सुरेश बंडू देसाई व मोटरसायकलवर पाठीमागे बसलेली सुरेखा राजाराम खोत यांना | नकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| | खाली पाडून गंभीर जखमी करणेस कारणीभूत झाला आणि त्याद्वारे भारतीय दंड संहिता कलम **३३८** खाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे हे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | |
| ४ | आरोपीने वरील नमूद दिनांक वेळी व ठिकाणी त्याचे ताबेतील बजाज सीटी १०० मोटरसायकल क्र. एम.एच.०९डी.झेड.११२८ हे वाहन भरधाव वेगाने, हयगयीने, निष्काळजीपणे, रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करून, जेणेकरुन मानवी जीवीत धोक्यात येईल अशा प्रकारे चालविले आणि त्याद्वारे मोटार वाहन कायदा कलम **१८४** खाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे हे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | नकारार्थी. |
| ५ | आरोपीने वरील नमूद दिनांक वेळी व ठिकाणी त्याचे ताबेतील बजाज सीटी १०० मोटरसायकल क्र. एम.एच.०९डी.झेड.११२८ हे वाहन भरधाव वेगाने, हयगयीने, निष्काळजीपणे, रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करून हयगयीने चालवून समोरील आंब्याकडून जाणारी स्प्लेंडर मोटरसायकल क्र. एम.एच०९डी.के.६०८६ हीस पाठीमागून धडक देऊन अपघात केला व सदर अपघाताची वर्दी न देता तसाच निघून गेला आणि त्याद्वारे मोटार वाहन कायदा कलम **१३४(१)(ब)** अन्वये आणि कलम **१८७** खाली शिक्षापात्र आणि या न्यायालयाच्या दखलगिरीत येणारा असा अपराध केला आहे हे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | नकारार्थी. |
| ६ | आदेश काय | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमिंमासा

## मुददा क्र. १ ते ६ करीता -

६. सदरकामी अभियोग पक्षातर्फे एका साक्षीदाराची साक्ष नोंदविलेली आहे. साक्षीदार क्र. १ संजय पांडुरंग महाजन हे पंचनामा पंच साक्षीदार असून त्याने त्याचे साक्षीमध्ये कथन केले की त्याला सन २०१७ मध्ये पंचनामेकामी शाहुवाडी पो. ठाणे यिेथे बोलावले व त्याची सही घेतली. सदर साक्षीदाराने पंचनामेवरील त्याची अ.क्र.१ वरील सही नि.२० ओळखली, मात्र पंचनामेतीलतील मजकूर त्यास माहित नसल्याचे कथन केले. सरकारी वकिलांचे उलटतपासात देखिल सदर साक्षीदाराने दि.२०/०२/२०१७ रोजीचे तथाकथित पंचनामेचे वेळी त्याला व दत्तात्रय खुटाळे यांना बोलावले होते व त्यांचेसमक्ष पंचनामा केला ही बाब पूर्णपणे नाकारली व विचारलेल्या सर्व उत्तरसूचक प्रश्नांची नकारार्थी उत्तरे दिली.

७. अभियोग पक्षाने सदरकामी अन्य कोणताही साक्षीदार तपासलेला नाही. अभियोग पक्षाचा पंचनामा पंच साक्षीदार क्र. १ याने अभियोग पक्षास प्रतिकूल साक्ष दिली आहे व त्याचेसमक्ष पंचनामा केल्याची बाब पूर्णपणे नाकारली आहे. तसेच अभियोग पक्षाने सदरकामी पंचनामेवरील अन्य पंच दत्तात्रय खुटाळे यास तपासलेले नाही. सबब, पंचनामा सबळ पुराव्यानिशी निर्विवादपणे शाबित होत नाही. अभियोग पक्षाने सदरकामी अन्य कोणताही अनुशंगिक साक्षीदार तपासलेला नाही. तसेच अभियोग पक्षाने सदरकामी घटनेतील फिर्यादी व तपासी अधिकारी यांना देखिल तपासलेले नाही. सदर घटनेचा अन्य कोणताही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार अभिलेखावरील पुराव्यावरून दिसून येत नाही. तसेच अभियोग पक्षाने सदरकामी घटनेतील जखमी व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार अपघातग्रस्त मोटरसायाकलस्वार सुरेश बंडू देसाई व पाठीमागे बसलेली सुखा राजाराम खोत यांना देखिल तपासलेले नाही. सबब, अपघाताची घटना नेमकी कशी घडली याबाबतचा खुलासा अभिलेखावरी पुराव्यावरून होत नाही. अभिलेखावरील पुराव्यावरून आरोपीविरूध्द कोणतीही गुन्हादर्शक बाब शाबित होत नाही. तसेच अभियोग पक्षास सदरकामी पुरेशी संधी

देऊन देखिल त्यांनी सदरकामी अन्य कोणताही साक्षीदार न तपासलेने त्यांचा पुरावा बंद करण्यात आला आहे. एकूणच, सदर अपघात नेमका कसा घडला याबाबत साशंकता निर्माण होत आहे. सबब, अभिलेखावरील साक्षीपुराव्याचे अवलोकन केले असता अपघाताच्या घटनेच्या वेळी आरोपीने त्याचे ताबेतील बजाज सीटी १०० मोटरसायकल क्र. एम.एच.०९डी.झेड.११२८ हे वाहन भरधाव वेगाने, हयगयीने, निष्काळजीपणे, रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करून हयगयीने चालवून समोरील आंब्याकडून जाणारी स्प्लेंडर मोटरसायकल क्र. एम.एच०९डी.के.६०८६ हीस पाठीमागून धडक देऊन मोटरसायकलस्वार सुरेश बंडू देसाई व मोटरसायकलवर पाठीमागे बसलेली सुरेखा राजाराम खोत यांना खाली पाडून गंभीर जखमी केले व अपघात करून त्याची वर्दी न देता तसाच निघून गेला ही घटना शाबित करण्यासाठी आरोपीविरूध्द कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. अभिलेखावरील पुरावा हा अपूरा असून घटनेचा उलगडा करण्यासाठी व आरोपीस सदरकामी सिध्ददोषी ठरविण्यासाठी पुरेसा नाही. सबब, आरोपीविरूध्द ठेवण्यात आलेले दोषारोपाबाबत त्यास सबळ पुराव्यानिशी निर्विवादपणे दोषी ठरविता येईल इतपत पुरावा अभिलेखावर न आलेने आरोपीस सदरकामी दोषी ठरवता येत नाही व त्यास संशयाचा फायदा देण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA सत्यमेव जयते

८. सबब, अभियोग पक्षाचे अभिलेखावरील पुराव्यावरून आरोपीविरूध्दचा ठेवलेला गुन्हयाचा मजकुर हा शाबित होत नसलेने आरोपी प्रस्तुत गुन्हयातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. सबब वर नमूद चर्चेस अनुसरून मी मुद्दा क्र.१ ते ६ चा निष्कर्ष नकारार्थी असा नोंदवित आहे आणि मुद्दा क्र. ७ करीता खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

**१.** आरोपी नामदेव हरी खोत यांची भारतीय दंड संहिता १८६० चे कलम २७९,३३७,३३८ तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४,१३४ब/१८७ या गुन्हयातुन भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७८(१) नुसार निर्दोष मुक्तता करणेत येत आहे.

२. आरोपीचा जामीनकदबा रदद करणेत येवुन त्याला स्वांतत्र्य देण्यात येत आहे.

३. आरोपीने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१अ प्रमाणे जामीन दयावा.

(खुल्या न्यायालयात घोषीत)

Pankaj Bhimrao Pawar

**स्थळ - शाहूवाडी**
**दिनांक – १६/०३/२०२६**

**( पी. बी. पवार )**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**मलकापुर-शाहूवाडी, जि. कोल्हापुर**

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original judgment.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | P. A. Vasudeo |
| Name of Court | P. B. Pawar, C.J.J.D & J.M.F.C. Malkapur-Shahuwadi |
| Date of Dictation | 16/03/2026 |
| Judgment signed by the P.O.on | 16/03/2026 |
| Judgment uploaded on | 16/03/2026 |

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते